RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई**

☎/ 🖷:- ०२२ २७५७१३९१ Website:www.mahalfa.in E.Mail:ad.report@mahalfa.in

**कार्यालयीन आदेश क्रमांक** ०३ **/२०१६** **दिनांक** 18 NOV 2016

विषय :- ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाबाबत.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ८ नुसार " लेखापरीक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर व्यवहार्यत: शक्य असेल तितक्या लवकर परंतु त्यानंतर ३ महिन्यापेक्षा उशीरा नसेल अशा मुदतीत लेखापरीक्षा केलेल्या व तपासलेल्या लेख्यासंबंधी एक अहवाल तयार केला पाहिजे व तो संबंधित प्राधिकरणाकडे व राज्य शासन निदेश देईल त्या अधिका-याकडे व संस्थेकडे पाठविला पाहिजे " तसेच

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४० (१) नुसार ग्रामपंचायतीच्या " लेखापरीक्षेच्या समाप्तीनंतर २ महिन्याच्या आत लेखापरीक्षण अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती व ग्रामपंचायतीकडे पाठविण्यात येईल " अशी तरतूद आहे.

सद्यस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल संबंधित संस्थाप्रमुख (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुख्याधिकारी नगरपालिका, महानगरपालिका आयुक्त, सरपंच ग्रामपंचायत) यांच्या व्यतिरिक्त मा.सचिव, संबंधित प्रशासकीय विभाग, मा.महालेखाकार मुंबई व नागपूर, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, संचालक व सह संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, सहाय्यक संचालक (पंरास व अहवाल) यांना निर्गमित केले जात आहेत.

या संचालनालयामार्फत सर्व ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल online पध्दतीने MAINS प्रणालीद्वारे तयार करण्यात येत असल्याने लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती उपरोक्त सर्व संबंधितांना Hard Copy स्वरुपात पाठविण्याची आवश्यकता नाही. तरी लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती निर्गमनाबाबत हे संचालनालय खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

अ) स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर उपरोक्त अधिनियमातील तरतूदीनुसार विहीत मुदतीत लेखापरीक्षण अहवालाच्या दोन प्रती (Hard Copy) तयार कराव्यात.

१. पहिली प्रत ज्या संस्थेचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे अशा संस्थेस निर्गमित करावी.

२. दुसरी प्रत ज्या स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाने (जिल्हा कार्यालय / महानगरपालिका लेखापरीक्षण उपविभाग) लेखापरीक्षण केले आहे, त्या कार्यालयाने कायमस्वरुपी जतन करावी.

ब) इतर सर्व संबंधितांना लेखापरीक्षण अहवालाची प्रत PDF File द्वारे त्यांच्या अधिकृत Email-ID वर पाठविण्यात यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी या आदेशाच्या दिनांकापासून करण्यात यावी.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य

प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव:-

१. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, मनपा / कोकण / पुणे / नाशिक /औरंगाबाद / अमरावती / नागपूर

२. सर्व सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, जिल्हा कार्यालय .

D : asa karyalayin aadesh